# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


**३६) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०३.०७.२०२६**

जिल्हा : अहिल्यानगर

| मागील आठवड्यातील हवामान (२६/०६/२०२६ ते ०२/०७/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०४/०७/२०२६ ते ०८/०७/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६ | २७ | २८ | २९ | ३० | ०१ | ०२ | < दिनांक > | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ |
| ०.० | १८.० | १.६ | ०.० | १३.६ | ५.६ | १३.० | पाऊस (मिमी) | १५ | ३२ | १८ | १० | ८ |
| ३७.८ | ३६.४ | ३२.८ | ३३.६ | ३४.० | ३४.२ | ३४.२ | कमाल तापमान (अंसे) | २९ | २८ | २७ | २८ | २९ |
| १८.९ | १७.९ | १७.७ | १७.९ | १८.१ | १८.३ | १८.१ | किमान तापमान (अंसे) | २३ | २२ | २२ | २२ | २२ |
| २.० | ६.० | ६.० | २.० | २.० | २.० | २.० | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ८१ | ८५ | ८४ | ७८ | ८३ | ८१ | ८५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९३ | ९२ | ९१ | ९१ | ८९ |
| ४२ | ४५ | ३९ | ३८ | ३८ | ३७ | ३९ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ८१ | ८१ | ७८ | ८० | ७५ |
| ४.८ | ५.० | ४.८ | ४.५ | ५.१ | ४.८ | ५.३ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | १८ | १९ | २१ | १८ | २० |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार, **पुढील पाच दिवस आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. दि. ५ व ६ जुलै रोजी काही ठिकाणी मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. तसेच इतर दिवस काही ठिकाणी हलका हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | विजेचा पुर्वानुमान मिळणेकरीता दामिनी मोबाईल अपचा वापर करावा.<br>हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | **पावसाची सुरवात झाल्यानंतर किमान ८०–१०० मिमी पाऊस झाल्यानंतरच वापसा आल्यांनतर खरीप पिकांची पेरणी करावी.** |
| खरीप नियोजन | | १) जमिनीची खोली लक्षात घेऊन त्याप्रमाणे पिकांचे नियोजन केल्यास अवर्षणवर्षी उत्पादनात स्थिरता आणण्यास मदत होईल. उपलब्ध जमिनीनुसार पिक व वाणांची निवड करावी.<br>२) आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा.<br>३) कमी कालावधीच्या वाणांचा वापर करावा.<br>४) कमी पाण्यावर येणाऱ्या वाणांचा वापर करावा.<br>५) पाण्याचा व तापमानाचा ताण सहनशील पिके व त्यांचे वाण वापरावेत.<br>६) पिकाची पेरणी ट्रॅक्टर चलित बीबीएफ पेरणी यंत्राने रुंद सरी वरंबा (BBF) पद्धतीने करावी.<br>७) पावसाचे पाणी साठवण (शेततळे, कंपार्टमेंट बंडिंग, सरी-वरंबा पद्धत)<br>८) ओलावा संवर्धन (आच्छादन (Mulching), कोळपणी, तण नियंत्रण)<br>९) ठिबक तसेच तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा.<br>१०) संतुलित खत व्यवस्थापन पत्रिकेचा खत व्यवस्थापनासाठी वापर करावा.<br>११) जिल्हानिहाय कृषी हवामान आधारित हवामान सल्ल्याचे नियमित पालन करणे.<br>१२) रसशोषक किडींच्या जैविक नियंत्रणासाठी पीकाच्या अवस्थेनुसार पिवळे चिकट सापळे, सापळा पीके, जैविक बुरशीनाशके (मेटारायझीयम, ट्रायकोग्रामा, व्हरटीसिलीयम इ.) यांचा वापर करावा. |
| कपाशी | उगवण | राज्यात काही भागांत कपाशीची पेरणी झाल्यानंतर उगवण चांगली झाली आहे. परंतु उगवण झाल्यानंतरही अद्याप बऱ्याच ठिकाणी समाधानकारक पाऊस झालेला नाही. अशा ठिकाणी कपाशीची लागवड होऊन ५–१० दिवस झालेले असल्यास कपाशी पिकास पाण्याचा ताण पडू शकतो. उगवणीनंतर ५–६ दिवसांच्या कपाशीच्या रोपांमध्ये दलपत्रे व अतिशय कोवळी खरी पाने असतात. या अवस्थेत पिकाची मुळे पूर्णपणे विकसित झालेली नसतात त्यामुळे पाण्याचा ताण पडल्यास रोपांची वाढ काहीशी मंदावू शकते.<br>**शेतकऱ्यांसाठी शिफारसी:**<br>१) उच्च तापमान व कमी आर्द्रतेच्या परिस्थितीत कोवळया पाने करपण्याची शक्यता असते.<br>२) १% युरिया (१० ग्रॅम/लिटर पाणी) याची हलकी फवारणी सकाळी किंवा सायंकाळी करावी.<br>३) सिंचनाची सुविधा उपलब्ध असल्यास हलके संरक्षित पाणी द्यावे. |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| | | ४) आच्छादनाचा उपयोग करून जमिनीतील ओलावा जतन करावा.<br>५) अनावश्यक कोळपणी किंवा मशागत टाळावी.<br>६) तणांचा प्रादुर्भाव असल्यास त्यांचे नियंत्रण करावे, कारण तण जमिनीतील उपलब्ध ओलावा शोषून घेतात.<br>७) पुरेशा ओलाव्याशिवाय किंवा पाऊस पडण्यापूर्वी नत्रयुक्त वरखत देऊ नये.<br>८) पाऊस पडल्यानंतर शिफारशीनुसार पुढील वरखते द्यावे. |
| **सोयाबीन** | **पेरणी पूर्व** | **वाणांची निवड:** फुले दूर्वा, फुले संगम, फुले अग्रणी, फुले किमया, फुले कल्याणी, जेएस ३३५, जेएस ९३०५<br>**बीजप्रक्रिया:** जमिनीतून प्रसार होणाऱ्या रोगांपासून संरक्षण करण्यासाठी प्रति किलो बियाणास कार्बोक्झीन ३७.५%+थायरम ३७.५% डी.एस. ३० ग्रॅम प्रति १० किलो बियाणास चोळावे त्यानंतर अॅझोक्सिस्ट्रोबीन २.५% + थायोफिनेट मिथाईल ११.२५% + थायोमिथोक्झाम २५% एफ.एस. १०० मिली किंवा थायोमिथोक्झाम ३०% एफ.एस. १०० मिली प्रति १० किलो बियाण्यास बीजप्रक्रीया करावी त्यामुळे खोड माशी पासून रोपावस्थेत पिकाचे संरक्षण होईल. |
| **कापूस** | **पेरणी पूर्व** | **वाणांची निवड:** फुले अनमोल, फुले शुभ्रा, फुले माही, फुले चेतना, फुले धारा व प्रचलीत बीटी कपाशीचे वाण<br>**बीजप्रक्रिया:** अप्रमाणित बियाण्यास कार्बाक्झिन ३७.५% + थायरम ३७.५% डब्ल्यू एस बुरशीनाशकाची प्रक्रिया प्रति किलो बियाण्यास ३.५ ग्रॅम या प्रमाणात करावी. त्यामुळे मुळकुज, जीवाणूजन्य करपा यांसारख्या रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो. |
| **तूर** | **पेरणी पूर्व** | **वाणांची निवड:** फुले राजेश्वरी, गोदावरी, भिमा, बीडीएन ७११, बीडीएन ७१६, फुले तृप्ती<br>**बीजप्रक्रिया:** पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाणास ५ ग्रॅम ड्रायकोडर्मा किंवा ४ ग्रॅम कार्बोक्झीन ३७.५% + थायरम ३७.५% डब्ल्यू.एस. या संयुक्त बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया करावी. यानंतर प्रत्येकी २५० ग्रॅम रायझोबियम व पी.एस.बी. जिवाणु संवर्धन १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणातून चोळावे. |
| **मूग** | **पेरणी पूर्व** | **वाणांची निवड:** फुले चेतक, फुले वैभव, फुले सुवर्णा<br>**बीजप्रक्रिया:** पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर लावावी व त्यानंतर प्रत्येकी २५ ग्रॅम रायझोबियम व पीएसबी जीवाणूच पावडर गुळाच्या थंड पाण्यामध्ये मिसळून लावावी. मूग, उडीद या पिकांच्या बियाणासाठी चवळी गटाचे रायझोबियम जीवाणू संवर्धन वापरावे. ट्रायकोडर्मामुळे बुरशीजन्य रोगाचे नियंत्रण होते. रायझोबियम मुळे मुळावरील गाठी वाढून नत्राची उपलब्धता वाढते. |
| **उडीद** | **पेरणी पूर्व** | **वाणांची निवड:** फुले राजन, फुले वसु, टी ए यू १, टी पी यू ४<br>**बीजप्रक्रिया:** पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर लावावी व त्यानंतर प्रत्येकी २५ ग्रॅम रायझोबियम व पीएसबी जीवाणूच पावडर गुळाच्या थंड पाण्यामध्ये मिसळून लावावी. मूग, उडीद या पिकांच्या बियाणासाठी चवळी गटाचे रायझोबियम जीवाणू संवर्धन वापरावे. ट्रायकोडर्मामुळे बुरशीजन्य रोगाचे नियंत्रण होते. रायझोबियम मुळे मुळावरील गाठी वाढून नत्राची उपलब्धता वाढते. |
| **मका** | **पेरणी पूर्व** | **वाणांची निवड:** राजर्षी, फुले महर्षी, आरभ<br>**बीजप्रक्रिया:** पेरणीपुर्वी २ ते २.५ ग्रॅम थायरम हे बुरशीनाशक प्रति किलो बियाण्यास चोळावे. तसेच अझोटोबक्टर जीवाणु संवर्धन २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास चोळून नंतर पेरणी करावी. |
| **सूर्यफूल** | **पेरणी पूर्व** | **वाणांची निवड:** फुले भास्कर, फुले रवीराज<br>**बीज प्रक्रिया:** केवडा रोग टाळण्यासाठी ६ ग्रॅम मेटॅलॅक्झिल ३५ डब्ल्यू. एस. प्रति किलो बियाण्यास चोळावे. विषाणूजन्य (नॅक्रॉसिस) रोगाच्या प्रतिबंधासाठी थायामिथोक्झाम ३०% एफ.एस.१० मिली प्रति किलो बियाण्यास लावावे. त्यानंतर अॅझोटोबॅक्टर हे जिवाणू खत २५ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास पेरणीपूर्वी लावावे. |
| **बाजरी** | **पेरणी पूर्व** | **वाणांची निवड:** धनशक्ती, फुले महाशक्ती, फुले आदिशक्ती, फुले मुक्ताई, एबीएच १२६९<br>**बीज प्रक्रिया:** बीजप्रक्रिया केलेले प्रमाणित बियाणे उपलब्ध नसल्यास पेरणीपूर्वी बियाण्यास २० टक्के मिठाच्या द्रावणाची प्रक्रिया करावी. त्यासाठी १० लिटर पाण्यात २ किलो मिठ विरघळावे. पाण्यावर तरंगणारे बुरशीयुक्त हलके बियाणे बाजुला काढून त्याचा नाश करावा व तळाला असलेले निरोगी आणि वजनाने जड असलेले बियाणे वेगळे करुन पाण्याने २ ते ३ वेळा धुवावे त्यानंतर सावलीत वाळवून पेरणीसाठी वापरावे |
| **भुईमुग** | **पेरणी पूर्व** | **वाणांची निवड:** फुले उन्नती, फुले भारती, फुले उनप, टीएजी २४, फुले मोरणा, फुले वारणा<br>**बीजप्रक्रिया:** बियाण्यापासून प्रादुर्भाव होणाऱ्या व रोपावस्थेत येणाऱ्या रोगापासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक चोळावे. नंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबीयम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक (घनरूप किंवा द्रवरूप) चोळावे बीजप्रक्रीया केलेले बियाणे सावलीत सुकवून पेरावे. |

**हवामान आधारीत कृषि सल्ला**
**ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,**
**कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**स्त्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : ०३.०७.२०२६

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**